**सत्र खटला क्र. ९६/२०१९ (अंतरिम जामीन)**

**महाराष्ट्र सरकार –विरुद्ध– तानाजी बळीराम भोसले व दादा उर्फ ऋषिकेश.**

--- ----------------------------------------

**निशाणी क्र. ३५ खालील आदेश**

सदरचा आदेश मी या अर्जालगतच पारित करीत असल्यामुळे त्यातील मजकूर पुन्हा नमूद करण्याचे कारण नाही.

२. सदर अर्जास विद्वान सरकारी वकिलांनी वादाचे म्हणणे निशाणी क्र. ३६ प्रमाणे दिले आहे. त्या म्हणण्यातील मजकूर खालीलप्रमाणे.

सदरचा अर्ज खोटा व चुकीचा आहे. त्यातील मजकूर मान्य व कबूल नाही. आरोपींविरुद्धचे गुन्हे गंभीर स्वरुपाचे आहेत. गुन्ह्यांना जन्मठेपेची वा कारावासाची आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. आरोपींविरुद्ध आवश्यक तो पुरावा मिळून आला आहे. गुन्हे अजामिनपात्र आहेत. मानवतेला काळीमा फासणारे आहेत. सर्व आरोपींनी एकमेकांशी कट करुन गुन्हा केला आहे. या आरोपींना अंतरिम जामीन मंजूर झाल्यास प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांवर दबाव दडपण येईल. आरोपींना कायद्याचा धाक राहणार नाही. ते आणखी गुन्हे करतील, न्यायालयात गैरहजर राहतील. फरार होतील. त्यामुळे हा अर्ज फेटाळावा.

३. वरीलप्रमाणे अर्ज पाहिला. विद्वान सरकारी वकिलांचे वादाचे म्हणणे निशाणी क्र. ३६ पाहिले. संपूर्ण प्रकरण बारकाईने पाहिले. उभयपक्षांच्या विद्वान वकिलांचा प्रदीर्घ युक्तिवाद ऐकला.

४. विद्वान सरकारी वकिलांच्या वादाच्या म्हणण्यातील शिक्षेबाबतचे विधान प्रथमदर्शनीच चुकीचे आहे. गुन्ह्यांस फक्त जन्मठेपेच्या कारावासाची नव्हे, तर फाशीची किंवा जन्मठेपेची आणि द्रव्यदंडाची, अशी शिक्षा प्रस्तावित आहे. ते असो.

५. या प्रकरणी संपूर्ण तपास होऊन आरोपींविरुद्ध अंतिम अहवाल/ दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे, हा आरोपींच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद योग्य आहे. मात्र, तेवढ्यावरुन अंतरिम जामीन मिळण्यास हे आरोपी आपापतः पात्र आहेत, असे मुळीच नाही. यांस अनेक कारणे आहेत.

६. सरकारपक्षाचे म्हणणे या परिच्छेदापासून परिच्छेद क्र. ९ पावेतो, खालीलप्रमाणे.

यातील मयत संतोष शिंदे याची पत्नी अनिता, म्हणजे आरोपी क्र. ५ होय. तिचे आणि आरोपी क्र. १ तानाजी भोसले यांचे मागील अनेक वर्षांपासून अनैतिक शरीरसंबंध होते. अनिता (आरोपी क्र. ५) ही तिचा पती (मयत) संतोषसोबत, तो काम करीत

असलेल्या गावी म्हणजे अहमदाबाद येथे रहातही नव्हती. आरोपी क्र. १ तानाजी आणि आरोपी क्र. ५ अनिता यांच्या अनैतिकसंबंधांना संतोष शिंदे (मयत) चा विरोध होता. संतोष आणि अनिता या पतीपत्नीमध्ये वकिलांमार्फत फर्माने पाठविणे, फौजदारीवाद दाखल करणे इत्यादीही प्रकार झाले आहेत.

७. घटनेच्या लगत अलीकडे मयत संतोष शिंदे हा त्याच्या आईसह अहमदाबाद येथून गावाकडे आला. ही माहिती त्याची पत्नी अनिता (आरोपी क्र. ५) हिला कळाली. त्यावेळी तिने आरोपी क्र. १ ते ४ यांच्यासह पती संतोषचे अपहरण करुन त्यास जिवे ठार मारण्याचा कट केला.

८. त्याप्रमाणे आरोपी क्र. १ ते ४ यांनी संतोष शिंदे आणि त्याच्या आईवर पाळत ठेवली. संतोष शिंदे यास आरोपी क्र. १ तानाजी आणि आरोपी क्र. ५ अनिता यांच्या अनैतिक शरीरसंबंधाच्या ध्वनिचित्रफिती भ्रमणध्वनीसंचावर आरोपी क्र. १ ते ४ यांनी दाखविल्या. संतोष यास मोटारसायकलवर हॉटेलमध्ये नेऊन भरपूर दारु पाजली. पुन्हा आरोपी क्र. १ व ५ यांच्या शरीरसंबंधाच्या अश्लिल छायाचित्रफिती भ्रमणध्वनीसंचावर दाखविल्या. त्यानंतर पुन्हा त्यांस भरपूर दारु पाजून एका झायलो कारमधून आरोपी क्र. १ ते ४ यांनी विजापूर (कर्नाटक) येथील दर्गाखान येथे नेले. तेथे आरोपी क्र. १ ते ४ यांनी मयत संतोष शिंदे यांस अंदाजे १६० ते १७० फूट असलेल्या दगडी खाणीत टाकले. तो १५ फुटाच्या टप्प्यावर अडकला असता, वरुन मोठमोठी दगडे टाकली.

९. त्यानंतर पोलिसांची व तपासाची दिशाभूल करण्यासाठी आरोपी क्र. १ ते ५ यांनी संगनमताने आरोपी क्र. ६ गणेश यांस मुंबईतून गावाकडे मयताच्या भावाला दूरध्वनी करावयास लावले व मयत संतोष शिंदे सांताक्रूझ येथे जखमी अवस्थेत असल्याचे आरोपी क्र. ६ गणेश याने इतर आरोपींच्या सांगण्यावरुन मयताच्या भावास सांगितले वगैरे वगैरे.

१०. वरील परिच्छेद क्रमांक ६ ते परिच्छेद क्रमांक ९ पावेतो सरकारपक्षाच्या खटल्याची तथ्ये थोडक्यात नमूद केली आहेत. त्या अनुषंगाने साक्षीदारांची तपासटिपणे आहेत. भारतीय पुराव्याचा कायदा, १८७२ च्या २७ कलमांतर्गत आरोपींची निवेदने आहेत. मुद्देमाल जप्त आहे. पंचनामे आहेत. रासायनिक परिक्षणांचे अहवाल आहेत. ध्वनिचित्रफिती मधील आवाजांच्या नमुन्यांचा पुरावा आहे. छायाचित्रे आहेत. अनेकानेक साक्षीदारांची तपासटिपणे आहेत. इतरही भरपूर आनुषंगिक पुरावे आहेत. त्यातून, घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी मयतास मोटारसायकलवर बसवून नेल्याचे पाहणाऱ्या साक्षीदारांचीही तपासटिपणे आहेत.

११. वरील लगतच्या परिच्छेद क्र. १० मध्ये नमूद केलेला पोलीसकागदपत्रांतील संपूर्ण कागदोपत्री दस्ताऐवज एकत्रितरित्या पाहिला असता, आरोपी क्र. १ ते ५ यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने मयत संतोष शिंदे याच्यावर पाळत ठेवली. त्यास बसस्थानकावर गाठले. त्यास, त्याच्या पत्नीचे आरोपी क्र. १ सोबत असलेल्या अनैतिक शरीरसंबंधाचे चित्रण दाखवून प्रक्षोभित केले. त्यास दारु पाजली. पुन्हा त्याच्या पत्नीच्या अनैतिक शरीरसंबंधाच्या ध्वनिचित्रफिती दाखविल्या, पुन्हा त्यास दारु पाजली. झायलो कारमध्ये परराज्यात (कर्नाटकात) निर्जन दगडी खाणीत नेले, १५० ते १६० फूट उंचीवरुन त्यास खाली टाकले, संतोष शिंदे मध्येच १५ फुटांवर अडकल्यानंतर वरुन मोठमोठे दगडे टाकली, इत्यादी प्रचंड व भरगच्च पुरावा प्रथमदर्शनी का होईना, या आरोपींविरुद्ध फैलावर आहे.

१२. या संपूर्ण कागदपत्रांचे स्वरुप पाहता संतोष शिंदे यास ठार मारण्याचा सुनियोजित फौजदारी कट आरोपी क्र. १ ते ५ यांनी रचल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. या खटल्यातील गुन्हे क्षणिक उद्रेकातून घडलेले नाहीत. अत्यंत थंड डोक्याने, अगदी नियोजनबद्ध पद्धतीने, ठरवून, पाळत ठेऊन, कट करुन, पूर्ण तयारी करुन सदरचे गुन्हे करण्यात आल्याचे दिसते. अर्थातच यातून आरोपींची भयानक मानसिकता प्रथमदर्शनी का होईना, स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर त्यांना अंतरिम जामिनावर सोडल्यास खचितच साक्षीदारांच्या मनोधैर्यावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. साक्षीदार फुटले जाण्याची शक्यता आहे. पुराव्यात ढवळाढवळ होण्याची शक्यता आहे. थंड डोक्याने गुन्हे करण्याची आरोपींची मानसिकता पाहता, ते फरार होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. तसे झाल्यास खटला अनिश्चित काळापावेतो प्रलंबित राहील. या संपूर्ण उहापोहाच्या पार्श्वभूमीवर सदरचा अंतरिम जामीनाचा अर्ज फेटाळला जाण्यास पात्र आहे.

१३. या निशाणी ३५ च्या अर्जात आरोपींच्या वतीने कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आरोपींच्या विद्वान वकिलांनी त्यांच्या तोंडी युक्तिवादात कोरोना प्रादुर्भावाच्या काळात थोडी लवचिक भूमिका घेऊन आरोपींना जामिनावर सोडण्याबाबतच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या स्वयंस्फूर्त याचिका क्र. १/२०२० मधील आदेशांचा व मा. उच्चाधिकार समितीच्या निर्देशांचा उल्लेख केला आहे आणि आरोपींस या परिस्थितीत अंतरिम जामिनावर सोडण्याची विनंती केली आहे.

१४. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार आणि मा. उच्चाधिकार समितीच्या निर्देशानुसार त्यातील आदेशांचे पालन करण्यास या न्यायालयास सहर्ष व सविनय आनंदच आहे. मात्र, मा. उच्चाधिकार समितीच्याच दिनांक २५.०३.२०२० रोजीच्या निर्देशांमध्ये

देखील नमूद करण्यात आले आहे की, गुन्ह्यांचे गांभीर्य, आरोपीची वर्तणूक, त्याचा पूर्वेतिहास, गुन्ह्यांतील सहभाग, इ. बाबींचा त्या त्या प्रकरणात असलेल्या तथ्यांचा सर्वांगीण विचार करुन जामीन अर्ज निर्णित करावा. मा. मुंबई उच्च न्यायालयातील जामीन अर्ज क्र. ४९/२०२०, दिनांक १५.०५.२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने (माननीय न्यायमूर्ती श्रीमती साधना एस्. जाधव, न्या. यांनी) देखील असेच आदेशित केले आहे. या प्रकरणातील गुन्ह्यांचे स्वरुप आणि त्यांचे गंभीर परिणाम पाहता या आरोपींस अंतरिम जामिनावर सोडण्याजोगी परिस्थिती नाही.

१५. या प्रकरणातील या व इतरही आरोपींचा नियमित जामीन अर्ज या आणि अशाच कारणांवरुन, याच न्यायालयाने आधीही फेटाळला आहे. नियमित जामीन अर्ज फेटाळला गेल्यानंतर या आरोपींनी हा अंतरिम जामिनाचा अर्ज दाखल करुन, पुन्हा त्यावर आदेश करण्याचा आग्रह धरला आहे. हा खटाटोप करणे अनावश्यक होते व आहे. याचे कारण म्हणजे या आरोपींचा नियमित जामीन अर्ज फेटाळतानासुद्धा कोविड–१९ च्या विषाणू प्रादुर्भावाची परिस्थिती होतीच. त्याचाही पूर्ण विचार आरोपींचा नियमित जामीन अर्ज फेटाळताना केलेला आहेच. त्यामुळे या कोरोना प्रादुर्भावाच्या परिस्थितीतही आणि इतर देखील परिस्थितीतही काहीच बदल झालेला नसताना व आरोपींचा नियमित जामिनाचा अर्ज फेटाळला गेला असताना, हा अर्ज मंजूर करणे मुळीच न्यायोचित होणार नाही. या संपूर्ण उहापोहाच्या पार्श्वभूमीवर हा अंतरिम जामीन अर्ज फेटाळला जाण्यास पात्र आहे व फेटाळण्यात येत आहे.

(चकोर श्रीकृष्ण बाविस्कर)

दिनांक : ०४.०७.२०२०. **अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- Smt. J. B. Kalshetti |
| (b) | Court | :- District Judge - 1, Pandharpur. |
| (c) | Order signed by P.O. on | :- 04.07.2020 |
| (d) | Order uploaded on | :- 04.07.2020. |